## टाटाच्या गाड्या आजपासून महागणार

नवी दिल्ली – करोनाचे संकट असतानाही टाटा मोटर्स कंपनी आपल्या प्रवासी वाहनांच्या किंमतीत आजपासून म्हणजेच ८ मेपासून महागणार आहेत. टाटा आपल्या गाड्यांच्या किंमतीत १.८ टक्क्यांची वाढ करणार आहे. मॉडेल आणि व्हेरीयंटच्या हिशोबाने टाटाच्या गाड्यांच्या किंमती असतील. वाहनांसाठी वापरण्यात येणाऱ्या पार्ट्सचे दर वाढल्यामुळे वाहनांच्या किंमतीत वाढ केल्याचे टाटा मोटर्सचे अध्यक्ष शैलेश चंद्रा यांनी सांगितले.

## व्यापार डायरी....

### गिव्हइंडियाचा कोविड निधी प्लॅटफॉर्म

नवी दिल्ली – गिव्हइंडियाने पुन्हा एकदा कोविड निधी उभारण्याच्या दृष्टीने ऑनलाईन प्लॅटफॉर्म सुरू केला आहे. कोरना महामारीच्या दुसऱ्या लाटेचा प्रादुर्भाव पाहता गिव्हइंडियाने पुन्हा कोविड रिस्पॉन्स फंड (आयसीआरएफ –२) हा ऑनलान प्लॅटफॉर्म सुरू केला असून यामाध्यमातून कोविड निधीची उभारणी केली जाणार आहे. गिव्हइंडियाने गेल्यावर्षी २२० कोटी रुपयांचा निधी उभारला होता तर वैयक्तिक दान योजनेच्या माध्यमातून जवळपास ३५ कोटी रुपये जमा झाल्याचे गिव्हइंडियाने म्हटले आहे. रुग्णालयांसाठी ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर्स प्रकल्प आणि ऑक्सिजन सिलींडर्स तसेच ऑक्सिजन सिलींडर्स भरण्याच्या प्रकल्पांसाठी निधीचा वापर करण्यात येणार आहे.

त्यासाटी महानगरपालिका, राज्य सरकार, हॉस्पिटर्स आणि डॉक्टर्स, निवडक स्वयंसेवी संस्था यांच्या माध्यमातून मदतकार्य कले जाणार आहे. सध्याच्या परिस्थिशी मुकाबला करण्याच्या दृष्टने इंडिया कोविड रिस्पॉन्स फंड –२ पुन्हा सुरू केल्याचे गिव्हइंडियाचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल सतीजा यांनी सांगितले.

### डाबरला ३७७ कोटींचा नफा

नवी दिल्ली – डाबर कंपनीच्या निव्वळ नफ्यात ३३.९८ टक्क्यांची वाढ झाली असून तो ३७७.३ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. चालू वित्तिय वर्षातील मार्चपर्यंत संपलेल्या चौथ्या तिमाहीतील नफा डाबर कंपनीने आज जाहीर केला. कंपनीला गेल्या वर्षी जानेवारी ते मार्च महिन्यातील तिमाहीपर्यंत २८१.६० कोटी रुपयांचा नफा झाला होता. तर कंपनीच्या महसुलात जानेवारी ते मार्च २०२१ पर्यंत २५.२७ टक्क्यांची वाढ झाली असून तो २,३३६.७९ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. गेल्या वर्षी हाच आकडा १,८६५.३६ कोटी इतका होता. कंपनीच्या उत्पादनात झालेल्या विक्रीच्या पार्श्वभूमीवर आणि बाजारातील आव्हानांचा समर्थपणे सामना केल्यामुळे कंपनीला चांगला नफा झाल्याचे डाबरचे भारतातील मुख्य कार्यकारी अधिकारी मोहीत मलहोत्रा यांनी म्हटले आहे.

# पुढची दोन वर्षे पतमान जैसे थे

**वृत्तसंस्था / नवी दिल्ली**

पुढची दोन वर्षे भारताच्या एकंदर पतमानात कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. सद्यस्थितीत असलेले पतमान पुढची दोन वर्षे कायम राहील असा अंदाज एस अॅण्ड पी या ग्लोबल रेटींग संस्थेने वर्तवला आहे. भारताचा विकास दर हळुहळू गती धरेल आणि त्याचा परिणाम म्हणून भारताचे एकंदर किंवा सार्वभौम पतमान जैसे थे राहाण्यास मदत होईल असेही एस अॅण्ड पी ने म्हटले आहे.

मार्च महिन्यात एस अॅण्ड पीने चालू वित्तीय वर्षात किंवा मार्च २०२२ या वित्तीय वर्षात भारताचा विकास दर ११ टक्के राहील असा अंदाज वर्तवला होता. परंतु, कोरोना महामारीची दुसरी लाट आल्याच्या पार्श्वभूमीवर भारताच्या जीडीपीत किंवा सकल राष्ट्रीय उत्पन्नात ९.८ टक्क्यांची घसरण होईल असा अंदाज वर्तविला. दरम्यान, मे महिन्यात परिस्थिती आणखी गंभीर बनत गेली तर जूनच्या अखेरीपर्यंत जीडीपी आणखी ८.२ टक्क्यांपर्यंत घसरण्याची शक्यताही एस अॅण्ड पीने व्यक्त केली होती.

दुसऱ्या लाटेचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर कशाप्रकारे परिणाम होईल या विषयाबाबत आयोजित वेबिनारमध्ये एस अॅण्ड पी रेटिंग एजन्सीच्या सोवरीयन अॅण्ड पब्लिक फायनान्स रेटिंग विभागाचे संचालक अॅण्ड्र्यु वुड यांनी आपली भुमिका मांडली. कोरोना महामारीच्या दुसऱ्या लाटेचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर आणि सरकारच्या




वित्तीय स्थितीवर फारसा परिणाम होणार नाही असे अॅण्ड्र्यु वुड यांनी सांगितले. चालू वित्तीय वर्षात महसुली उत्पन्नावर विपरित परिणाम होईल परंतु, ९० टक्क्यांहून अधिक जीडीपी स्थिर राहील असेही वुड यांनी सांगितले. दरम्यान, भारताचे पतमान बीबीबी रेटिंगवर स्थिर असून यात पुढच्या दोन वर्षात कुठल्याहीप्रकारचा बदल होणार नाही याकडेही वुड यांनी लक्ष्य वेधले. परंतु, कोरोना महामारीची दुसरी लाट नियंत्रणाबाहेर गेली तर त्याचा विपरित परिणाम भारताच्या पतमानावर होऊ शकतो असेही वुड यावेळी म्हणाले.

गेल्या वर्षी सलग १३ व्या वर्षात एस अॅण्ड पीने भारताचे पतमान कायम ठेवले होते. परंतु, अतिशय कमी गुंतवणूकीच्या पार्श्वभूमीवर हे पतमान अतिशय कमी किंवा खराब होते. दरम्यान, कोरनाची दुसरी लाट मध्यम किंवा गंभीर राहीली तर पुढच्या वित्तीय वर्षात म्हणजेच २०२२–२३ या वित्तीय वर्षात भारताचा विकास दर क्रमश: ७.८ आणि ९.६ टक्के राहील असा अंदाज एस अॅण्ड पीने वर्तवला होता. तर कोरोनाच्या दुसऱ्या लाटेची तीव्रता वाढली तर भारतीय अर्थव्यवस्था रुळावर येण्याची शक्यता कमी असल्याचे फीच रेटींग या संस्थेने म्हटले होते. फीचने मार्च २०२२ या वित्तीय वर्षात भारताचा जीडीपी १२.८ टक्क्यांपर्यंत राहील असा अंदाज वर्तविला होता.

तर ही लाट मध्यम स्वरुपाची राहीली तर बारताचा जीडीपी वित्तीय वर्ष २०२३ मध्ये ५.८ टक्क्यांपर्यंत राहील असा अंदाज व्यक्त केला होता. भारतात आतापर्यंत तब्बल २.१४ कोटींहून अधिक कोरनाबाधित आढळले असून मृत्यूचा आकडाही २,३४,०८३ वर गेला आहे. भारतासाठी ही परिस्थिती भयावह असून त्याचा अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे.

### राजकोषीय तुटीचे लक्ष्य कठीण

चालू वित्तीय वर्षात म्हणजेच मार्च २०२२ पर्यंत भारताला राजकोषी तुटीचे लक्ष्य साधणे कठीण असल्याचे फीच सोल्युशन्सने म्हटले आहे. महसूलात घट होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर फीच सोल्युशन्सने हा अंदाज वर्तविला आहे. एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ या कालावधित जीडीपीच्या तुलनेत राजकोषीय तुट ८.३ टक्क्यांपर्यंत राहण्याची शक्यताही फीच सोल्युशन्सने व्यक्त केली आहे.

# दुसऱ्या लाटेचा अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम नाही

**वृत्तसंस्था / नवी दिल्ली**

भारतात सध्या कोरोना महामारीच्या दुसऱ्या लाटेने अक्षरशः थैमान घातले आहे. परंतु, या लाटेचा पहिल्या लाटेच्या तुलनेत भारतीय अर्थव्यवस्थेवर हलकासा परिणाम होईल किंवा गंभीर परिणाम होणार नाही असे अर्थमंत्रालयाने आपल्या अहवालात म्हटले आहे. अर्थव्यवस्थेवर हलका परिणाम होणार असला तरीही एप्रिल ते जुनदरम्यानच्या म्हणजेच चालू वित्तीय वर्षाच्या पहिल्या तिमाहीत आर्थिक व्यवहारांवर मात्र नकारात्मक परिणाम होईल असेही अर्थमंत्रालयाने म्हटले आहे.

अर्थमंत्रालयाने एप्रिल महिन्यासाठीचा मासिक आर्थिक आढावा प्रकाशित केला आहे. यात अर्थमंत्रालयाने आपली भूमिका मांडली आहे. पहिल्या लाटेच्या तुलनेत दुसऱ्या लाटेचा अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होणार नाही. पहिल्या लाटेच्या वेळी आलेल्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर दुसऱ्या लाटेत अर्थव्यवस्था मजबूत राहील अशी अपेक्षा आहे असेही अर्थमंत्रालयाने म्हटले आहे. वित्तीय वर्ष २०२०–२१ च्या दुसऱ्या तिमाहीत आर्थिक व्यवहारांमध्ये सुधारणा झाल्यामुळे केंद्र सरकारची राजकोषीय स्थिती चांगली राहीली आहे. पहिल्या लाटेच्या तुलनेत दुसऱ्या लाटेत एप्रिल महिन्यात आर्थिक व्यवहारांत सुधारणा झाली आहे. यंदा सर्वसाधारण पाऊस होण्याचा अंदाज असल्यामुळे अन्नधान्याचे चांगले उत्पादन होणअयाचा अंदाज आहे. परिणामी, ही अर्थव्यवस्थेसाठी सकारात्मक बाब आहे. ग्रामीण भागात ट्रॅक्टरची विक्रमी विक्री झाली असून ट्रॅक्टरच्या विक्रीत तब्बल १७२ टक्क्यांची वाढ झाली आहे. तर औद्योगिक उत्पादनात संमिश्र परिस्थिती आहे. फेब्रुवारी २०२१ मध्ये आद्योगिक उत्पादन निर्देशांकात ३.६ टक्क्यांची मोठी घट दिसली. फेब्रुवारीमध्ये हाच निर्देशांक ३.९ टक्के इतका होता.

## आरबीआयच्या मदतीमुळे रुग्णालयांतील बेड्सची क्षमता वाढणार

**वृत्तसंस्था / मुंबई** – राज्याच्या कोविड लढ्याला बळ प्राप्त करून देण्यासाठी आरबीआय अर्थात भारतीय रिझर्व्ह बँकेने आरोग्य सुविधांपोटी ५० हजार कोटी रुपये निधीची घोषणा केली. यासाठी रेपो दराने बँकांना हा निधी पुढील तीन वर्षांसाठी उपलब्ध होणार आहे. या विशेष खिडकीची सुविधा ३१ मार्च २०२२ पर्यंत सुरू राहणार आहे. या विशेष सुविधेचा प्रामुख्याने रुग्णालयांना लाभ होणार असून रुग्णालयांतील बेड्सची क्षमता १५ ते २० टक्क्यांनी वाढण्यास मदत होणार आहे. क्रीसील रेटींग्स या संस्थेने याबाबतचा अहवाल तयार केला आहे. आरोग्य सुविधा देणाऱ्या कंपन्यांना हे कर्ज कमी व्याजदरात उपलब्ध करून देण्याचा बँकाचा मानस आहे. लस तसेच औषधांची निर्मिती आणि पुरवठा करणाऱ्या कंपन्या, रुग्णालये, पॅथॉलॉजी लॅब्स, ऑक्सिजनचा पुरवठा करणारे, आपत्कालिन स्थितीत आरोग्य सुविधा वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करून देणाऱ्या कंपन्या, लॉजिस्टीक फर्म्स यांना निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## शेअर बाजार सलग तिसऱ्या दिवशी वधारला

**वृत्तसंस्था / मुबई**

मुंबई शेअर बाजारात सलग तिसऱ्या दिवशी धुम दिसली. गुंतवणूकदारांनी सकारात्मक मानसिकतेने मोठ्या प्रमाणावर शेअर्सची खरेदी केल्यामुळे शेअर बाजारात तेजी दिसली. तर अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया तब्बल २७ पैशांनी वधारल्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये सकारात्मक वातावरण होते. परिणामी, मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक २५६.७१ अंकांनी किंवा ०.५२ टक्क्यांनी वधारून तो ४९,२०६.४७ वर बंद झाला.

# अब की बार पेट्रोल १०० पार

**वृत्तसंस्था / नवी दिल्ली**

पेट्रोलचे आणि डिझेलचे दर दिवसेंदिवस वाढतच चालले आहेत. आज पेट्रोलने दरवाढीचा कळस केला. सलग चौथ्या दिवशी दरात वाढ दिसली. राजस्थानात पेट्रोलचे दर प्रति लिटरला १०२ रुपये इतके झाले. पश्चिम बंगालसह इतर राज्यांमधील निवडणुका संपल्यानंतर देशात रोजच्या रोज इंधन दरवाढ होत आहे. आज शुक्रवारी पेट्रोलच्या दरात प्रति लिटरमागे २९ पैशांची तर डिझेलच्या दरात ३१ पैशांची वाढ झाली.





दिल्लीत पेट्रोलचे दर प्रति लिटर ९१.२७ तर डिझेलचे दर ८१.७३ रुपये प्रति लिटर इतके होते. मुंबईत पेट्रोलचे दर ९७.६१ रुपये प्रति लिटर तर डिझेलचे दर ८८.८२ रुपये प्रति लिटर इतके होत. याआधी मुंबईत पेट्रोलचे दर ९७.३४ रुपये प्रति लिटर तर डिझेलचे दर ८८.४९ रुपये प्रत लिटर इतके होते. मध्यप्रदेशातील अनुप्पुर येथे पेट्रोलचे दर प्रति लिटरमागे १०१.८६ रुपये इतके झाले तर महाराष्ट्रातील परभणीत पेट्रोलचे दर ९९.५ रुपये प्रति लिटर इतके होते. २७ एप्रिलपासून क्रुड ऑईलच्या दरात सातत्याने वाढ होऊन क्रुड ऑईलचे दर प्रति बॅरल ७० अमेरिकन डॉलरपर्यंत पोहोचले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती सातत्याने वाढत असल्याने इंधन दरातही वाढ होत आहे.

**NOTICE-CUM-ADDENDUM TO THE SCHEME INFORMATION DOCUMENT ('SID') AND KEY INFORMATION MEMORANDUM ('KIM') OF THE SCHEME(S) OF AXIS MUTUAL FUND ('THE FUND')**

Notice is hereby given for the following matters:

1. **Risk-O-Meter of the schemes of Axis Mutual Fund:**

Investors are requested to take note of following change in Risk-o-meter of the schemes of Axis Mutual Fund as per the monthly evaluation of risk level pursuant to SEBI circular no. SEBI/HO/IMD/DF3/CIR/P/2020/197 dated October 05, 2020 on Product labelling in mutual fund schemes - Risk-o-meter:

| Name of the scheme(s) | Risk-o-meter (As per SEBI circular dated October 5, 2020) |
|---|---|
| Axis Overnight Fund |  |
| Axis Corporate Debt Fund<br>Axis Gilt Fund<br>Axis Short Term Fund |  |
| Axis Credit Risk Fund |  |
| Axis Equity Saver Fund |  |

Riskometer captions (in order): Investors understand that their principal will be at low to moderate risk; Investors understand that their principal will be at moderate risk; Investors understand that their principal will be at moderately high risk; Investors understand that their principal will be at high risk.

Note - There are no changes in product labelling details other than that mentioned above. For product labelling along with risk-o-meter of all scheme(s) of Axis Mutual Fund, kindly visit www.axismf.com.

The relevant sections of SID and KIM of aforesaid schemes of Axis Mutual Fund shall stand modified in accordance with the above changes. All other terms & conditions of SID and KIM of the aforesaid schemes of Axis Mutual Fund will remain unchanged.

This addendum forms an integral part of the SID and KIM of relevant scheme(s) of the Fund.

2. **Updation of Scheme Information Document ('SID') and Key Information Memorandum ('KIM') of scheme(s):**

Investors/ unitholders are requested to note that in terms of regulatory requirements, SID and KIM of all the open ended schemes of Axis Mutual Fund have been updated and can be viewed at www.axismf.com. The provisions of the SID are revised to incorporate regulatory changes and other data updations/ changes.

Investors are requested to kindly take note of the above.

**For Axis Asset Management Company Limited**
**(CIN - U65991MH2009PLC189558)**
**(Investment Manager to Axis Mutual Fund)**

**Place : Mumbai**
**Date : May 07, 2021**
**No. : 07/2021-22**

**Sd/-**
**Chandresh Kumar Nigam**
**Managing Director & Chief Executive Officer**

**Statutory Details:** Axis Mutual Fund has been established as a Trust under the Indian Trusts Act, 1882, sponsored by Axis Bank Ltd. (liability restricted to ₹ 1 Lakh). **Trustee:** Axis Mutual Fund Trustee Limited **Investment Manager:** Axis Asset Management Company Limited (the AMC) **Risk Factors:** Axis Bank Ltd. is not liable or responsible for any loss or shortfall resulting from the operation of the schemes. **Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.**

AXIS MUTUAL FUND

Axis House, First Floor, C2, Wadia International Centre, Pandurang Budhkar Marg, Worli, Mumbai - 400 025, India.
TEL : (022) 4325-5161, FAX : (022) 4325-5199, EMAIL : customerservice@axismf.com, WEBSITE : www.axismf.com,
EASYCALL : 1800 221 322 ADDITIONAL CONTACT NUMBER : 8108622211

### जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, **१) सौ. सरोज अतुल गाला आणि २) श्री. अतुल मावजी गाला** यांनी फ्लॅट क्र. १०९, १ला मजला, ए–१ विद्यादानी को–ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., ओम नगर, सहार पाईप लाईन रोड, सहार, अंधेरी (पूर्व), मुंबई–४०००९९ हा असलेल्या फ्लॅट(यानंतर सदर फ्लॅट असा उल्लेख) च्या संदर्भामध्ये श्री. धनंजय काशिनाथ शर्मा यांच्यासह दिनांक १८/१२/२०१९ रोजीचा टोकन करार/एमओयु (यानंतर सदर करार असा उल्लेख) करत आहेत. **श्री. धनंजय काशिनाथ शर्मा** यांनी पूर्वीच सदर फ्लॅटच्या संदर्भामध्ये रू. १२,००,०००/– (रूपये बारा लाख मात्र) ची एकुण रक्कमेचा भरणा केला आहे. सदर कराराच्या अन्वये **श्री. धनंजय काशिनाथ शर्मा** यांच्या नावामध्ये सदर फ्लॅटवर भार निर्माण केला आहे.

भार तयार करूनही **१) सौ. सरोज अतुल गाला आणि २) श्री. अतुल मावजी गाला** यांनी सदर फ्लॅटसह व्यवहार केला आणि सदर फ्लॅटच्या संदर्भामध्ये त्रयस्थ पक्ष हक्क तयार केले आहेत. नोंद घ्यावी की, सदर फ्लॅटच्या संदर्भामध्ये कोणताही व्यक्ती व्यवहार करीत असल्यास कायद्याच्या प्रक्रियेनंतर त्यावर कारवाई केली जाईल.

दिनांक: ०८/०५/२०२१.

**श्री. धनंजय काशिनाथ शर्मा**
त्यांचे पीओए धारक नितिन पी. भदोरिया द्वारे,
मोबा.:+९१ ९८६७५३६४९९

IDFC
IDFC MUTUAL FUND

**Notice-cum-Addendum No. 15 of 2021**

**Notice-cum-Addendum to the Statement of Additional Information (SAI) of IDFC Mutual Fund (the Fund)**

**Amendment to Investment Valuation Norms of the Fund**

Investors / Unit holders of the schemes of the Fund are requested to note that the Fund has amended Investment Valuation Norms for Securities and Other Assets ("Valuation Policy").

Pursuant to the above, the Valuation Policy forming part of the SAI of the Fund stands amended, effective from May 03, 2021. The revised policy has been hosted on our website i.e. www.idfcmf.com. The policy can be accessed using the link https://www.idfcmf.com/download-centre/disclosures.

Investors are requested to take note of the above.

**All the other provisions of the SAI of the Fund except as specifically modified herein above, read with the addenda issued from time to time, remain unchanged.**

**This addendum forms an integral part of the SAI of the Fund, read with the addenda issued from time to time.**

Place : Mumbai
Date : May 07, 2021

**MUTUAL FUND INVESTMENTS ARE SUBJECT TO MARKET RISKS, READ ALL SCHEME RELATED DOCUMENTS CAREFULLY.**

### जोस्टस् इंजिनिअरिंग कंपनी लिमिटेड

**सीआयएन क्र. एल२८१००एमएच१९०७पीएलसी०००२५२**
**नोंदणी. कार्यालय :** ग्रेट सोशल बिल्डिंग, ६०, सर फिरोजशाह मेहता रोड, मुंबई–४०० ००१.
**दू. क्र.** ९१–२२–६२३७८२००● फॅक्स : ९१–२२–६२३७ ८२०१ ● **वेबसाईट : www.josts.com ● ई–मेल : jostsho@josts.in**

**३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षासाठी अलिप्त आणि एकत्रित लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचा उतारा** (रु. लाखात)

| तपशील | अलिप्त | | | | | एकत्रित | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संपलेली तिमाही ३१ मार्च, २०२१ | संपलेली तिमाही ३१ डिसेंबर, २०२० | संपलेली तिमाही ३१ मार्च, २०२० | संपलेले वर्ष ३१.०३.२०२१ | संपलेले वर्ष ३१.०३.२०२० | संपलेली तिमाही ३१ मार्च, २०२१ | संपलेली तिमाही ३१ डिसेंबर, २०२० | संपलेली तिमाही ३१ मार्च, २०२० | संपलेले वर्ष ३१.०३.२०२१ | संपलेले वर्ष ३१.०३.२०२० |
| | लेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| प्रवर्तनातून एकूण उत्पन्न | २,९६७.५७ | २,४५२.०२ | २,२६१.३७ | ८,६४८.५५ | १०,३५५.९२ | ३,२६७.४४ | २,७३१.५९ | २,५५०.०० | ९,६४७.४१ | ११,५१४.१८ |
| कर, अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींपूर्वी सर्वसाधारण कामकाजातून निव्वळ नफा/(तोटा) | २१६.४० | १४६.०३ | ६०.३१ | ५५५.९० | ५४१.४६ | १९९.१५ | १२६.४८ | २९.२६ | ४९५.८४ | ४६०.७५ |
| अपवादातत्मक बाबी | – | – | ३२०.६९ | – | ३८३.७७ | – | – | ३२०.६९ | – | ३८३.७७ |
| करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | १७९.७६ | १०१.०९ | (२६७.१३) | ४०८.८३ | १०४.०४ | १६२.५१ | ८१.५४ | (२९८.१८) | ३४८.७७ | २३.३३ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न | १९४.४९ | ९४.२१ | (२७३.९६) | ४२४.३७ | ९१.९५ | १९६.३२ | ७४.६६ | (३०६.०३) | ३८३.३९ | १०.२२ |
| समभाग भांडवल | ९३.२९ | ९३.२९ | ९३.२९ | ९३.२९ | ९३.२९ | ९३.२९ | ९३.२९ | ९३.२९ | ९३.२९ | ९३.२९ |
| राखीव (ताळेबंदात दाखवल्याप्रमाणे पुनर्मूल्यांकित राखीव वगळून) | | – | | २,९७१.८३ | २,५७५.४५ | – | – | | २,७८५.०९ | २४१२.७१ |
| प्रत्येकी रु. १०/– ची प्रती समभाग प्राप्ती (अवार्षिक) रु. | | | | | | | | | | |
| (ए) मूलभूत : | १९.२७ | १०.८४ | (२८.६३) | ४३.८२ | ११.१५ | १८.१२ | ८.७४ | (३०.६५) | ३९.९० | २.५० |
| (बी) सौम्यिकृत : | १९.२७ | १०.८४ | (२८.६३) | ४३.८२ | ११.१५ | १८.१२ | ८.७४ | (३०.६५) | ३९.९० | २.५० |

**टिपा:**

१. हे विवरण कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत विहित कंपनीज (इंडियन अकाऊंटिंग स्टँडर्डस्) रुल्स, २०१५ (इंड एएस) सहवाचता कंपनीज (इंडियन अकाऊंटिंग स्टँडर्ड) रुल्स, २०१५ चा नियम ३ ला अनुसरून बनवले आहे.
२. ह्या वित्तीय निष्कर्षांच्या मंजुरीच्या तारखेपर्यंत अंतर्गत आणि बाह्य माहितीच्या आधारे ३१ मार्च, २०२१ रोजीस तिच्या कामकाज रोख तरलता स्थिती आणि तिच्या मत्तांची वसुली योग्यता यावरील कोव्हीड–१९ साथरोगाचा होऊ शकणारा परिणाम कंपनीने विचारात घेतला आहे. ह्या वित्तीय निष्कर्षांच्या मंजुरीच्या तारखेरोजीस केलेल्या अंदाजापेक्षा कोव्हीड–१९ चा परिणाम वेगळा असू शकतो आणि व्यवस्थापन कंपनीच्या वित्तीय व प्रचालन कामगिरीवर ह्या साथरोगाच्या प्रभावातून उद्भवणाऱ्या कोणत्याही मोठ्या बदलांवर लक्ष ठेवून आहे आणि परिस्थितीचे निराकरण करण्यासाठी आवश्यक उपाय योजत आहे.
३. भारतीय संसदेने सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० मंजुर केले, कंपनीकडून प्रॉव्हिडंट फंड आणि ग्रॅच्युईटीसाठी केल्या जाणाऱ्या अंशदानावर त्याचा परिणाम होईल. श्रम आणि रोजगार मंत्रालयने १३ नोव्हेंबर, २०२० रोजी सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० साठी मसुदा नियम प्रकाशित केले आणि हितसंबंधियांकडून सूचना मागवल्या ज्या मंत्रालयाकडून कृतीशील विचाराधीन आहेत. संदर्भित नियम अधिसूचित झाल्यावर कंपनी त्यांचा परिणाम आणि मूल्यांकन यांचा आढावा होईल आणि ज्या कालावधी संहिता प्रभावी होईल त्या कालावधीतील तिच्या वित्तीय विवरणात सुयोग्य माहिती दिली जाईल आणि संबंधित नियमांचा वित्तीय परिणाम ठरवला जाईल.
४. लेखा परीक्षण समितीने वरील निष्कर्ष पुनर्विलोकीत करून शिफारस केली आणि ६ मे, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत संचालक मंडळाने ते मंजुर केले. वैधानिक लेखापरीक्षकांच्या मर्यादित पुनर्विलोकन अहवालांत कोणत्याही अर्हता नाहीत.
५. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या तिमाहीसाठीची आकडेवारी आणि ह्या वित्तीय निष्कर्षांमध्ये कळवलेल्या मागील वर्षात संपलेल्या संलग्न तिमाहीसाठीची आकडेवारी ह्या संपूर्ण आर्थिक वर्षाच्या संबंधातील लेखापरीक्षित आकडेवारी आणि संबंधित आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाही आखेरपर्यंत तारखेपर्यंत वर्षाच्या प्रकाशित आकडेवारी दरम्यानच्या तौलानिक आकडेवारी आहेत. त्याचप्रमाणे तिसऱ्या तिमाही अखेरवपर्यंतच्या आकडेवारी फक्त पुनर्विलोकित केल्या होत्या व लेखापरीक्षणाच्या अधीन नव्हत्या.
६. बुधवार, २४ मार्च, २०२१ रोजी झालेल्या कंपनीच्या विशेष सर्वसाधारण सभेत (ईजीएम) सभासदांनी सध्याच्या रु. १०/– प्रती समभाग दर्शनी मूल्या पासून प्रत्येकी रु. ५ चे दर्शनी मूल्य असणाऱ्या २नव्या समभागांमध्ये कंपनीच्या समभागांच्या स्टॉक विभाजनास मंजुरी दिली. कंपनीने निर्धारित केलेली रेकॉर्ड डेट आहे २१ मे, २०२१.
७. आवश्यकतेनुसार आधीच्या कालावधीसाठी आकडेवारी पुनर्गठीत केली आहे.
८. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी ३०% लाभांशाची शिफारस (प्रत्येकी रु. १०/– च्या दर्शनी मूल्याच्या प्रति समभाग रु. ३) कंपनीच्या संचालक मंडळाने केली.

**रेकॉर्ड डेट ची सूचना**

याद्वारे सूचना देण्यांत येते की, कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ च्या तरतुदी आणि सेबी (लिस्टींग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४२ नुसार कंपनीने–समभागांचे पोट–विभाजनः कंपनीच्या भाग भांडवलातील प्रत्येकी रु. १०/– दर्शनी मूल्य असलेल्या एक (१) समभागाची संपूर्ण भरण झालेल्या प्रत्येकी रु. ५/– दर्शनी मूल्य असलेल्या २ (दोन) समभागांत पोट–विभाजन होईल, यासाठी भागधारकांची पात्रता ठरवण्याच्या कारणास्तव रेकॉर्डडेट म्हणून शुक्रवार, २१ मे, २०२१ ही तारीख मुक्रर केली आहे. सूचना कंपनीची वेबसाईट www.josts.com वर आणि कंपनीचे शेअर्स ज्यावर सूचिबद्ध आहेत त्या स्टॉक एक्सचेंज ची वेबसाईट www.bseindia.com वर सुद्धा उपलब्ध आहे.

**जोस्टस् इंजिनिअरिंग कंपनी लिमिटेड साठी**
जय प्रकाश अगरवाल
अध्यक्ष

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०६ मे, २०२१

epaper.freepressjournal.in